जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 MAR 2025
सकाळ

# समाजोपयोगी संशोधन व्हावे

## कुलगुरू : विद्यापीठात राष्ट्रीय विज्ञान दिनी कार्यक्रम



कोल्हापूर :शिवाजी विद्यापीठात रसायनशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या कार्यक्रमात बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. यावेळी शेजारी डॉ. के. डी. सोनवणे, एस. डी. डेळेकर, के. एम. गरडकर उपस्थित होते.

कोल्हापूर, ता. २८ : 'विद्यापीठातील संशोधन ग्रामीण भागापर्यंत पोहोचले पाहिजे, समाजोपयोगी संशोधन व्हावे', असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज येथे केले.

राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विद्यापीठातील रसायनशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. विकसित भारताचे स्वप्न साकारण्यासाठी नवतरुणांना काय करावे लागेल, याबाबत कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. परावलंबीपणाकडून स्वावलंबीपणाकडे येण्याचे महत्त्वदेखील सांगितले. विभागातर्फे घेण्यात आलेल्या प्रश्नमंजूषा, चित्रकला, पोस्टर प्रेझेंटेशन या स्पर्धांचे प्रमाणपत्र वितरण त्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विभागप्रमुख प्रा. डॉ. के. डी. सोनवणे, समन्वयक प्रा. डॉ. के. एम. गरडकर, एस. डी. डेळेकर, जी. एस. राशिनकर, डी. एम. पोरे, राहुल माने, आदी उपस्थित होते. दरम्यान, या विभागातर्फे पुण्यातील राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे शास्त्रज्ञ प्रा. मिलिंद निकालजे आणि दिल्ली विद्यापीठातील प्राध्यापक मनोज प्रसाद यांचे व्याख्यान आयोजित केले होते. त्यांनी दैनंदिन जीवनातील विज्ञानाचे महत्त्व सांगितले. रसायनशास्त्र विभागांमध्ये पोस्टर प्रदर्शन आणि प्रयोगाच्या प्रात्यक्षिकांसह सादरीकरण करण्यात आले.

### कार्यक्रम अन् प्राध्यापकांची पाठ

रसायनशास्त्र अधिविभागाने २४ ते २८ फेब्रुवारी दरम्यान राष्ट्रीय विज्ञान सप्ताहअंतर्गत विविध उपक्रम आयोजित केले होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते या उपक्रमांच्या उद्घाटनावेळी विभागातील प्राध्यापकांची उपस्थिती कमी होती. त्यानंतर कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या उपस्थितीमध्ये झालेल्या कार्यक्रमावेळी देखील तेच चित्र होते. अगदी आज कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीतील समारोपाच्या कार्यक्रमालाही मोजकेच प्राध्यापक आणि तासिका तत्त्वावरील सहायक प्राध्यापक उपस्थित होते. अधिविभागात हजर असूनदेखील काही प्राध्यापकांनी या कार्यक्रमाकडे पाठ फिरविली. त्यावर कुलगुरूंनी देखील 'उपस्थित असणाऱ्यांचे आणि जे कामात व्यस्त आहेत त्यांचेही आभार' असा उल्लेख करत नाराजी व्यक्त केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 MAR 2018
सकाळ



नांदगाव : श्रीपतराव चौगुले कॉलेजच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलताना डॉ. प्रल्हाद माने सोबत मान्यवर.

# विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेकडे सकारात्मकदृष्ट्या पाहावे : डॉ. माने

कोतोली, ता. २८ : 'राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्काराची प्रयोगशाळा आहे. सुसंस्कारित सक्षम पिढी घडविण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना हीच पहिली पायरी आहे. विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेकडे सकारात्मक दृष्टीने पाहणे गरजेचे आहे,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे युवा संसदेचे समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांनी केले.

कोतोली (ता. पन्हाळा) येथे श्रीपतराव चौगुले आर्टस्‌ ॲण्ड सायन्स कॉलेजमधील राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत नांदगाव (ता. शाहूवाडी) येथे सातदिवसीय निवासी विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. के. एस. चौगुले होते. उपाध्यक्ष प्रा. जी. टी. पाटील, संचालक कल्पनाताई चौगुले, डॉ. अजय चौगुले, सचिव शिवाजीराव पाटील, प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील, सरपंच गीता गुरव, उपसरपंच अरुण कांबळे, सदस्य श्रीपतराव गुरव, सरिता पाटील, शालाबाई लाड, शुभांगी खराडे, आनंदा खराडे, ग्रामसेवक सागर निकम उपस्थित होते. डॉ. एम. के. कांबळे यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. पाहुण्यांची ओळख प्रा. डी. एच. नाईक, डॉ. उमा पाटील यांनी सूत्रसंचालन तर प्रा. एच. एस. शिरसट यांनी आभार मानले.

01 MAR 2025

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कुसुमाग्रजांची कविता शाश्वत सत्य मांडणारी

▪ प्रा. राजेंद्र दास यांचे प्रतिपादन



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त काढण्यात आलेल्या ग्रंथदिंडीमध्ये सहभागी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रा. राजेंद्र दास, डॉ. महादेव देशमुख, डॉ. नंदकुमार मोरे आदी.

प्रतिनिधी

कोल्हापूर

कुसुमाग्रज यांच्या कवितेने मराठी कवितेत एका युगाची निर्मिती केली. त्यांची कविता वर्धिष्णु स्वरूपाची आहे. भव्य, दिव्य आणि मंगलतेची पूजा करणारा कवी म्हणून कुसुमाग्रज मराठी काव्यविश्वाला परिचित आहेत. कुसुमाग्रजांची कविता शाश्वत सत्य मांडणारी आहे, असे प्रतिपादन प्रा. राजेंद्र दास यांनी केले.

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभागात आयोजित कवी कुसुमाग्रज व्याख्यानमालेत 'कवी कुसुमाग्रज यांची कविता' या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले. अमोल देशमुख यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले. यावेळी इंग्रजी अधिविभाग प्रमुख डॉ. प्रभंजन माने, डॉ. अक्षय सरवदे, डॉ. भादले उपस्थित होते.

**ग्रंथदिंडीचा उत्साह**

मराठी भाषा गौरव दिनाचा उत्साह शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी मुख्य प्रशासकीय इमारतीपासून वि. स. खांडेकर भाषा भवनापर्यंत ग्रंथदिंडीचे आयोजन केले. मुख्य इमारतीसमोर कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते पालखीचे पूजन करण्यात आले. पालखीमध्ये भारतीय संविधान, श्री ज्ञानेश्वरी, श्री नामदेव गाथा, तुकारामबोवांच्या गाथेचे निरुपण हे ग्रंथ ठेवण्यात आले होते. विद्यापीठ प्रांगणातून 'ज्ञानबा–तुकाराम'च्या गजरात दिंडी काढण्यात आली. हुपरीच्या संत बाळूमामा भजनी मंडळाचे लिंगाप्पा मुधाळे, चंद्रकांत ऐनापुरे, भीमराव जाधव, काकासो हांडे, धोंडीराम मुधाळे, दिग्विजय खोत, आदींनी दिंडीमध्ये मोठी रंगत आणली.

01 MAR 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नेहरूंच्या विज्ञान दृष्टिकोनामुळेच देश स्वयंपूर्ण

## डॉ. श्रीराम पवार : शिवाजी विद्यापीठात विशेष व्याख्यान

**सकाळ वृत्तसेवा**



कोल्हापूर : व्याख्यानात बोलताना ज्येष्ठ पत्रकार डॉ. श्रीराम पवार. यावेळी शेजारी डॉ. प्रल्हाद माने, व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.

कोल्हापूर, ता. २८ : 'पंडित जवाहरलाल नेहरू यांचे भारताच्या विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या विकासामधील योगदान फार मोलाचे आहे. त्यांच्या विज्ञानवादी दृष्टिकोनामुळे भारत स्वयंपूर्ण बनला', असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार, राजकीय विश्लेषक डॉ. श्रीराम पवार यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या नेहरू अभ्यास केंद्रातर्फे राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त आयोजित केलेल्या विशेष व्याख्यानप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते. डॉ. पवार म्हणाले, 'नेहरूंना समजून घेणे म्हणजे आधुनिक भारत समजून घेणे आहे. नेहरूंनी भाक्रा-नानगल धरण प्रकल्प, आय.आय.टी. सारख्या शिक्षण संस्था, परमाणू ऊर्जा आयोग आणि इस्रोसारख्या संस्थांची पायाभरणी करून भारताच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्राचा विकास केला. कृषी, उद्योग आणि अंतराळ क्षेत्रातील त्यांचे द्रष्टेपण हे भारताच्या आधुनिकतेला नवे परिमाण प्राप्त करून देणारे ठरले. नेहरूंनी शस्त्रास्त्र स्पर्धेपेक्षा विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या आधारे देशाच्या स्वयंपूर्णतेवर भर दिला. त्यांच्या धोरणांमुळे भारत विज्ञान क्षेत्रात आत्मनिर्भर बनला.' डॉ. पवार यांनी नेहरूंचे तुरुंगवासातील चिंतन, लेखन आणि विज्ञानवादी विचारसरणीवर देखील प्रकाश टाकला.

यावेळी डॉ. जगन कराडे यांच्यासह शिक्षक, संशोधक विद्यार्थी उपस्थित होते. नेहरू अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांनी प्रास्ताविक केले. मतीन शेख यांनी सूत्रसंचालन केले. सुहास रोमणे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
01 MAR 2025 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मराठी भाषा गौरव दिनानिमित्त 'भावगुज'

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग व अभिव्यक्ती कोल्हापूर यांच्यातर्फे गुरुवारी मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने 'भावगुज' हा अभिवाचनाचा कार्यक्रम झाला.

संकलन व दिग्दर्शन भानू प्रवीण देशपांडे यांनी केले. यामध्ये अंकुश कुलकर्णी, अजय वेदपाठक, हर्षवर्धन रणनवरे, अनाम देशपांडे व भानू देशपांडे हे कलाकार सहभागी झाले. कार्यक्रमाची सुरुवात काशी महाराजांच्या मंगलाचरणाने झाली. त्यानंतर शांता शेळके यांच्या 'एकपानी' तसेच हिमांशू स्मार्त यांच्या 'गंधाचे मौन' आणि 'अवडंबराच्या निचऱ्याचे प्रकरण' यांतील ललित गद्याचे अभिवाचन झाले. विं. दा. करंदीकर, आरती प्रभू, सूर्यकांत खोडेकर, वा. रा. कांत व अरुण कोल्हटकर यांच्या कविता व गाणी सादर झाली. डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी स्वागत केले. डॉ. संजय तोडकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 MAR 2025

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात भावगुज अभिवाचन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ व अभिव्यक्ती कोल्हापूर यांच्यावतीने संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त 'भावगुज' अभिवाचनाचा कार्यक्रम झाला. कार्यक्रमाचे संकलन व दिग्दर्शन भानू देशपांडे यांनी केले. यामध्ये अंकुश कुलकर्णी, अजय वेदपाठक, हर्षवर्धन रणनवरे, अनाम देशपांडे व भानू देशपांडे हे कलाकार सहभागी झाले होते. कार्यक्रमाची सुरुवात काशी महाराजांच्या मंगलाचरणाने झाली. त्यानंतर शांता शेळके यांच्या एकपानी, तसेच हिमांशु स्मार्त यांच्या 'गंधाचे मौन' आणि 'अवडंबराच्या निचऱ्याचे प्रकरण' यांतील ललित गद्याचे अभिवाचन झाले. विं. दा. करंदीकर, आरती प्रभू, सूर्यकांत खोडेकर, वा. रा. कांत, अरुण कोल्हटकर यांची कविता व गाणी सादर करण्यात आली. मराठी भाषेतील शब्दसौंदर्य, भाषेची गोडी, काळाच्या ओघात विस्मृतीत गेलेले शब्द, एखाद्या दृश्याचे कवीने-लेखकाने केलेले शब्दांतील वर्णन आणि भाषेद्वारे व्यक्त होणाऱ्या भावनांचे वर्णन व चित्रण या अभिवाचनातून उलगडत गेले. डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी स्वागत केले. डॉ. संजय तोडकर यांनी आभार मानले.

01 MAR 2025

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# उमेश बोळके यांच्या काजवा लघुपटाने 'स्पार्क'ची सांगता

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या बी.ए. फिल्म मेकिंग अभ्यासक्रमांतर्गत स्पार्क चित्रपट महोत्सवाचा समारोप दिग्दर्शक उमेश बोळके यांच्या 'काजवा' लघुपटाने झाला.

फिल्म मेकिंग अभ्यासक्रमांतर्गत 'स्पार्क फिल्म फेस्टिव्हल'चे आयोजन केले होते. जिल्ह्यातील राष्ट्रीय व फिल्मफेअर पुरस्कारप्राप्त लघुपट आणि माहितीपटांचे स्क्रिनिंग करण्यात आले. पहिल्या दिवशी सचिन सूर्यवंशी यांच्या 'वारसा' आणि 'सॉकर सिटी', संजय दैव यांचा 'देशकरी', रोहित कांबळे यांचा 'देशी', मेधप्रणव पोवार यांची 'हॅपी बर्थ डे', नीतेश परुळेकर यांचा 'बॅकयार्ड' या लघुपट व माहितीपटांचे प्रदर्शन झाले.

उमेश बगाडे यांची 'अनाहूत', सुधीर गुरव यांची 'लागीर', स्वप्निल पाटील यांचा 'मधुबाला' व उमेश बोळके यांच्या 'काजवा'चे शुक्रवारी प्रदर्शन केले.

समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी महोत्सवाचे संयोजन केले. दिग्दर्शक अनुप जत्राटकर यांनी सहसंयोजन केले. ज्येष्ठ साहित्यिक दादासाहेब मोरे, साहित्यिक विमल मोरे, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर, डॉ. सुमेधा साळुंखे, जयप्रकाश पाटील, माहिती अधिकारी वृषाली पाटील, राजेंद्र मोरे, चंद्रशेखर गुरव, विशाल कुलकर्णी, संदीप गावडे तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 MAR 2025

तरुण भारत

# 'काजवा'ने 'स्पार्क' चित्रपट महोत्सवाची सांगता

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या बी. ए. फिल्म मेकिंग अभ्यासक्रमांतर्गत दोन दिवसीय स्पार्क चित्रपट महोत्सवाचा समारोप दिग्दर्शक उमेश बोळके यांच्या 'काजवा' लघुपटाने झाला. फेस्टिव्हलमध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त आणि फिल्म फेअर पुरस्कारप्राप्त लघुपट आणि माहितीपटांचे स्क्रिनींग करण्यात आले. बी. ए. फिल्म मेकिंग अभ्यासक्रमांतर्गत दि. २७ व २८ फेब्रुवारी रोजी 'स्पार्क फिल्म फेस्टिवल'चे आयोजन करण्यात आले होते. महोत्सवाच्या समारोपादिवशी उमेश बगाडे यांची अनाहूत, सुधीर गुरव यांची लागीर, स्वप्नील पाटील यांचा मधुबाला आणि उमेश बोळके यांच्या काजवा लघुपटांचे प्रदर्शन करण्यात आले. यावेळी दिग्दर्शकांनी उपस्थित विद्यार्थी आणि प्रेक्षकांशी आपल्या चित्रकृतींविषयी संवाद साधला आणि त्यांचे शंकासमाधान केले.

01 MAR 2025

जनसंपर्क कक्ष
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात सोमवारपासून गणित उपयोजन राष्ट्रीय परिषद

कोल्हापूर, ता. २८ : शिवाजी विद्यापीठाच्या गणित अधिविभागात सोमवारी (ता. ३ मार्च) आणि मंगळवारी (ता. ४) 'नॅशनल कॉन्फरन्स ऑन ॲप्लीकेबल मॅथेमॅटिक्स -२०२५' या विषयावर राष्ट्रीय परिषद होणार आहे.

या परिषदेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होणार असून लखनऊ विद्यापीठ आणि नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस. बी. निमसे हे बीजभाषण करतील. बंगळूरच्या चाणक्य विद्यापीठाचे डॉ. एस. श्रीनिवास राव, बी. उमा, हैदराबाद विद्यापीठाचे डॉ. सचिनकुमार भालेकर, मुंबई विद्यापीठाचे डॉ. बी. एस. देसले, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे डॉ. विनायक जोशी, पुण्याच्या भास्कराचार्य प्रतिष्ठानचे डॉ. एस. ए. कात्रे आणि पुण्याच्या ए.आर.डी.इ.चे निवृत्त शास्त्रज्ञ डॉ. एस. डी. नाईक यांची व्याख्याने होतील, अशी माहिती परिषदेचे समन्वयक डॉ. सुनील कुंभार यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 MAR 2025
पुढारी

# विद्यापीठात गणित विषयावर सोमवारी राष्ट्रीय परिषद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या गणित अधिविभागात सोमवार दि. ३ व ४ रोजी 'नॅशनल कॉन्फरन्स ऑन ॲप्लिकेबल मॅथेमॅटिक्स' विषयावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती समन्वयक डॉ. सुनिल कुंभार यांनी दिली. परिषदेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते होणार असून लखनऊ विद्यापीठ आणि नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस. बी. निमसे यांचे बीजभाषण होणार आहे. परिषदेत बंगळुरूच्या चाणक्य विद्यापीठाचे डॉ. एस्. श्रीनिवास राव, डॉ. बी. उमा, हैदराबाद विद्यापीठाचे डॉ. सचिनकुमार भालेकर, मुंबई विद्यापीठाचे डॉ. बी. एस्. देसले, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे डॉ. विनायक जोशी, पुण्याच्या भास्कराचार्य प्रतिष्ठानचे डॉ. एस. ए. कात्रे, एआरडीईचे निवृत्त शास्त्रज्ञ डॉ. एस. डी. नाईक यांचे मार्गदर्शन होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर
01 MAR
लोकमत

# विद्यापीठात सोमवारपासून गणित राष्ट्रीय परिषद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या गणित अधिविभागात येत्या ३ व ४ मार्चला 'नॅशनल कॉन्फरन्स ऑन ॲप्लिकेबल मॅथेमॅटिक्स - २०२५' या विषयावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन केल्याची माहिती परिषदेचे समन्वयक डॉ. सुनील कुंभार यांनी दिली. परिषदेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होणार असून, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस. बी. निमसे बीजभाषण करतील.परिषदेत बंगळुरूच्या चाणक्य विद्यापीठाचे डॉ. एस. श्रीनिवास राव आणि डॉ. बी. उमा, हैदराबाद विद्यापीठाचे डॉ. सचिनकुमार भालेकर, मुंबई विद्यापीठाचे डॉ. बी. एस. देसले, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे डॉ. विनायक जोशी, डॉ. एस. ए. कात्रे आणि निवृत्त शास्त्रज्ञ डॉ. एस. डी. नाईक यांची व्याख्याने होतील. ४५ संशोधक शोधनिबंध सादर करतील.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 MAR 2025
सकाळ



कोल्हापूर : गोंडवाना विद्यापीठातर्फे आयोजित आंतरराज्य विद्यापीठ टेबल टेनिस स्पर्धेत उपविजेतेपद पटकाविलेल्या शिवाजी विद्यापीठ संघात अद्वैत बोंद्रे, देव बकरे, ऋषिकेश नलवडे, अनिश सोनटक्के, झैद स्वार यांचा समावेश होता.

## राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव

# टेबल टेनिस स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ उपविजेता

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २८ : गडचिरोलीतील गोंडवाना विद्यापीठातर्फे आयोजित राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवांतर्गत टेबल टेनिस स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संघाने उपविजेतेपद पटकाविले.

बल्लापूर (चंद्रपूर) येथील क्रीडा संकुलात झालेल्या या स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संघाने पहिल्या फेरीत यजमान गोंडवाना विद्यापीठ संघाला दोन विरुद्ध शून्य गुणाने पराभूत केले. त्यानंतर जळगावच्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ संघाला दोन विरुद्ध शून्य गुणाने हरविले. तिसऱ्या फेरीत नागपूरच्या महाराष्ट्र कृषी आणि मत्स्य विज्ञान विद्यापीठ संघाला दोन विरुद्ध शून्य गुणाने पराभूत केले. चौथ्या फेरीत मुंबईच्या एच. एस. एन. विद्यापीठ संघालाही दोन विरुद्ध शून्य गुणाने पराभूत केले.

पाचव्या फेरीत नाशिकच्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ संघालाही दोन विरुद्ध शून्य गुणाने हरवत उपांत्य फेरीत प्रवेश केला. उपांत्य लढतीत नागपूरच्या आर. टी. एम. विद्यापीठालाही दोन विरुद्ध शून्य गुणाने पराभूत करीत अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम फेरीत स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठाकडून पराभव पत्करावा लागला. संघात अद्वैत बोंद्रे, देव बकरे, ऋषिकेश नलवडे, अनिश सोनटक्के, झैद स्वार यांचा समावेश होता. संघाला प्रशिक्षक संग्राम चव्हाण, प्रा. रुद्रेश शिवफुले यांचे मार्गदर्शन, तर क्रीडा विभागप्रमुख डॉ. शरद बनसोडे, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रोत्साहन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 MAR 2025
पुढारी

# विद्यापीठाकडून ७८४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्यावतीने हिवाळी सत्रातील आजअखेर ७८४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील संलग्न महाविद्यालयात पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सध्या सुरू आहेत. शुक्रवारी चार परीक्षांचे निकाल जाहीर झाले. यात एम.ए. (समाजशास्त्र) विविध सत्रांचा समावेश आहे. परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणा-या विद्यार्थ्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.